# निशाणी क्र. ११९ वरील आदेश

वादीने प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी क्रमांक ३ च्या नावे दावा मिळकतीमधील गाळपासाठी गेलेल्या ऊसाचे बिल वादीस अदा करण्याबाबत संबंधित कारखान्यास आदेश दयावेत यासाठी दाखल केला आहे.

२. अर्ज व प्रतिवादी क्रमांक ३ च्या वारसांचे नि.क्र. १३१ ला असलेले म्हणणे अवलोकन केले. वादी व प्रतिवादींतर्फे विद्वान विधिज्ञांचा युक्तीवाद ऐकला. लेखी युक्तीवाद अवलोकन केला.

३. दावा मिळकतीमध्ये वादी व त्यांचे दोन भाऊ प्रतिवादी क्रमांक १ व बाबन यांचा हक्क व हिस्सा आहे याबाबत वाद नाही. बाबन याने दिनांक १७/०८/१९९८ च्या खरेदीपत्रान्वये दावा मिळकती व त्यांच्या इतर समाईक मिळकती पैकी त्याचा २ आणे ८ पैचा हिस्सा प्रतिवादी क्रमांक २ ला विक्री केलेला आहे असे खरेदीपत्रावरुन दिसून येते. दिनांक २०/०७/२००७ च्या खरेदीपत्रानुसार प्रतिवादी क्रमांक १ व त्याचा मुलगा प्रतिवादी क्रमांक २ यांनी दावा मिळकतीमधील त्यांचा ५ आणे ४ पै हिस्सा प्रतिवादी क्रमांक ३ ला विक्री केला आहे असे दिसून येते.

४. वादीच्या म्हणण्यानुसार भावांमध्ये दावा मिळकतीबाबत वाटप झालेले नाही, दावा मिळकतीमध्ये वादीची समाईक कब्जे वहिवाट आहे, त्यामुळे प्रतिवादी क्रमांक ३ यांना सन २००७ सालच्या खरेदीपत्राने दावा मिळकतीमधील क्षेत्राचा कब्जा

मिळालेला नाही.

५. तथापि, दिनांक १७/०८/१९९८ चे खरेदीपत्रान्वये वादीचा भाऊ बाबन याने प्रतिवादी क्रमांक २ यास दावा मिळकत व अन्य समाईकातील मिळकती पैकी २ आणे ८ पैचा हिस्सा केवळ विक्री केला नसून त्या प्रमाणे क्षेत्राचा कब्जा देखील दिला आहे असे दिसून येते. प्रतिवादी क्रमांक २ हा वादी व बाबनचा सख्खा भाऊ नाही तर तो त्यांचा पुतण्या आहे. वादीने सदरचे खरेदीपत्र आव्हानीत केलेले नाही. त्यांचे वाटप झाले नसल्यामुळे सदर खरेदीपत्रातील क्षेत्राचा कब्जा बाबन याने प्रतिवादी क्रमांक २ ला हस्तांतरीत केलाच नाही असे वादीचे कथन नाही. दिनांक २४/०२/१९८७ च्या गहाण स्वरुपी मुदत खरेदी दस्ताद्वारे वादी याने स्वतः दावा मिळकत गट क्रमांक ३३३/१ मधील त्याच्या १ आणे ९ पै हिस्स्याचे क्षेत्र विलास शिरचंद सेठीया याला गहाण दिले होते व त्या क्षेत्राचा कब्जा देखील दिला होता असे दिसून येते. त्यानंतर दिनांक १०/०२/१९९२ च्या प्रतिहस्तांतर दस्ताद्वारे वादीने या क्षेत्राचा कब्जा विलास शिरचंद सेठीया याच्या कडून घेतला असे दिसून येते. दिनांक २१/०६/२०१२ च्या खरेदीपत्रान्वये वादीने दावा मिळकत गट क्रमांक ३३३/१ मधील त्याच्या मालकीचे ४ पै क्षेत्र ४ आर अब्दुल उस्मान शेख याला विक्री करुन त्या क्षेत्राचा कब्जा अब्दुल उस्मान शेख याला दिला आहे असे दिसून येते. त्यानंतर दिनांक १८/०५/२०१५ च्या खरेदीपत्रान्वये अब्दुल उस्मान शेख याने सदर ४ पै ४ आर क्षेत्र बशीर गुलाब शेख याला विक्री केले व त्या क्षेत्राचा कब्जा बशीर गुलाब शेख याला दिला आहे असे दिसून येते.

यावरुन दावा मिळकत ही वादी याची समाईक कब्जे वहिवाटीची आहे असे मुळीच वाटत नाही. ज्या अर्थी वादीने व त्याच्या भावांनी दावा मिळकत व त्यांच्या इतर समाईक मिळकतींचे खरेदी विक्री व्यवहार केले आहेत त्या खरेदी विक्री व्यवहाराद्वारे त्यांनी त्या त्या क्षेत्राचा कब्जा खरेदीदाराला दिला आहे, त्या अर्थी या मिळकती अदयाप वादी व त्याच्या दोन भावांच्या समाईक आहेत असे मुळीच वाटत नाही.

६. वादी यांनी दावा मिळकतीमध्ये ऊसाची लागण केली आहे अगर ऊसाचे पीक जोपासले आहे याबाबत कारखान्यास ऊस नोंद असलेला कागदोपत्री पुरावा वादीने दाखल केला नाही. याउलट दावा मिळकतीमधील ऊस लागण प्रतिवादी क्रमांक ३ ने केल्याची नोंद कारखान्याला केली असल्याचा कागदोपत्री पुरावा प्रतिवादी क्रमांक ३ ने दाखल केला आहे, सदरची नोंद ही २०१८–२०१९ साठी केलेली आहे. तसेच, २०१९ साली प्रतिवादी क्रमांक ३ शितल जाधव हिच्या नावे दावा मिळकतीमधील ऊस जरंडेश्वर साखर कारखान्यास गाळपासाठी गेला आहे असे दिसून येते. अशा परिस्थितीत दावा मिळकतीमध्ये प्रतिवादी क्रमांक ३ ची स्वतंत्र कब्जे वहिवाट आहे व दावा मिळकतीमधील ऊस प्रतिवादी क्रमांक ३ ने पिकवला आहे हे प्रथम दर्शनी स्थापित होते.

७. वादी यांनी नि.क्र. ५८ च्या अर्जामध्ये प्रतिवादी क्रमांक ३ चे वारस, प्रतिवादी क्रमांक ३क यांनी तिच्या पतीच्या मदतीने दावा मिळकतीमध्ये कोणत्याही स्वरुपाचे ग्रीन हाऊस चे बांधकाम करुन शेड उभे करु नये यासाठी तुर्तातुर्त मनाईची मागणी केली होती. तथापि, वादीची कोणतीही तशी मागणी नसताना माझे विद्वान

पूर्वाधिकारी यांनी त्या अर्जावर दावा मिळकतीमधील वादीच्या कब्जे वहिवाटीस प्रतिवादी क्रमांक ३ च्या वारसांनी हरकत व अडथळा करु नये असा आदेश पारित केला आहे. सदरचा आदेश मा. जिल्हा न्यायाधीश यांनी कायम केला आहे. मात्र प्रतिवादी क्रमांक ३ च्या वारसांनी हे आदेश मा. मुंबई उच्च न्यायालयात आव्हानित केले आहेत. त्यामुळे नि.क्र. ५८ वरील सदर आदेश कायम झाला असे या क्षणी म्हणता येणार नाही. माझे विद्वान पूर्वाधिकारी यांनी नि.क्र. ५८ च्या आदेशामध्ये परिच्छेद क्रमांक ६ मध्ये वादीने दाखल केलेल्या ७/१२ उता–यामधील नोंदी वरुन वादी व प्रतिवादी क्रमांक ३ यांचा दावा मिळकतीमध्ये कायदेशीर कब्जा आहे असे स्पष्ट मत नोंदवले आहे. त्यामुळे नि.क्र. ५८ वरील वर नमुद आदेशाच्या आधारे दावा मिळकतीपैकी प्रतिवादी क्रमांक ३ ने खरेदी घेतलेल्या क्षेत्रामध्ये वादीची समाईक वहिवाट आहे व त्या क्षेत्रातील ऊस वादीनेच पिकवला आहे असे मला वाटत नाही.

८. या पूर्वी वादीने नि.क्र. १०१ ला दावा मिळकतीमधील आल्याचे पीक काढण्यासाठी पोलीस संरक्षण मिळण्याकरीता अर्ज दाखल केला होता. तथापि, तो अर्ज वादीनेच नॉट प्रेस केला. त्यामुळे तो फाईल्ड करण्यात आला आहे. दावा मिळकतीमधील आले पीकाचे बिल प्रतिवादीने याकामी जमा करावे यासाठी नि.क्र. १०६ चा अर्ज वादीने दिला होता, तो अर्ज गुणावगुणावर फेटाळण्यात आला आहे. वादीने नि.क्र. ७७ ला प्रतिवादी क्रमांक ३ ने दावा मिळकतीमध्ये ग्रीन हाऊस साठी छोटे शेड उभे केलेल्या ७० आर क्षेत्रामध्ये ऊस तोडणी करीता पोलीस संरक्षण मिळण्याकरीता अर्ज दाखल केला

होता. तथापि, नि.क्र. ९४ च्या अर्जाद्वारे तो ऊस प्रतिवादींनी स्वतःच्या नावे चोरुन नेला आहे असे कथन करुन त्या ऊसाचे बिल प्रतिवादी क्रमांक ३ ला देवू नये असा कारखान्यास आदेश व्हावा असा अर्ज वादीने दिल्यामुळे नि.क्र. ७७ चा अर्ज निरर्थक झाल्याने तो अर्ज फाईल्ड करण्यात आला आहे. नि.क्र. ९४ चा अर्ज दिनांक २३/०३/२०२० रोजी दाखल करण्यात आलेला आहे. तथापि, त्या वेळी कोरोना निर्बंधामुळे पक्षकार व वकील न्यायालयात येत नव्हते. त्यामुळे ही परिस्थिती पाहून त्या अर्जावर दिनांक २६/०३/२०२० रोजी सदरचे बिल कारखान्याने पुढील आदेशा पर्यंत तसेच राखून ठेवावे असा आदेश पारित करण्यात आलेला आहे.

९. वादीने दाव्यासोबत नि.क्र. ५ ला प्रतिवादी क्रमांक ३ ने दावा मिळकतीमधील वादीच्या समाईक कब्जे वहिवाटीस हरकत व अडथळा करु नये असा अर्ज दिला होता. मात्र वादीनेच दिनांक १०/११/२०११ रोजी सदरचा अर्ज अंतिम दाव्यासोबत चालवण्यात यावा असे लिहून दिल्यामुळे तो अर्ज दिनांक १०/११/२०११ रोजी फाईल्ड करण्यात आला आहे. जर खरोखरच दावा मिळकतीच्या संपूर्ण क्षेत्रामध्ये वादीचा समाईक कब्जा असता व प्रतिवादी क्रमांक ३ त्याच्या कब्जे वहिवाटीस हरकत अडथळा करत असती तर २००८ साली दाखल केलेला हा नि.क्र. ५ चा अर्ज न चालवता वादीने सन २०११ साली हा अर्ज दाव्यासोबत चालवण्यात यावा असे मुळीच लिहून दिले नसते. तसेच, वादीला पुरेशी संधी मिळून देखील त्याने परिणामकारक तजवीज केली नाही म्हणून दिनांक २३/०४/२०१४ च्या आदेशान्वये हा दावा निकाली

काढण्यासाठी ठेवण्यात आला होता. तेव्हापासून वादीने कोणतीही तजवीज केली नाही व वादी हा गैरहजर राहत होता. त्यामुळे दिनांक १३/१२/२०१७ रोजी हा दावा काढून टाकण्यात आला होता. त्यानंतर सन २०१९ साली दिवाणी किरकोळ अर्ज क्रमांक १/२०१८ मधील आदेशानुसार हा दावा पुन्हा फैलावर घेण्यात आला आहे. अशा प्रकारे सन २००८ पासून २०१९ पर्यंत या ११ वर्षाच्या कालावधीत दावा मिळकतीमधील कब्जाच्या सुरक्षे विषयी वादीला काहीच रस नव्हता व प्रतिवादी क्रमांक ३ ही वादीच्या वहिवाटीस हरकत करत होती हे सत्य नव्हते हे स्पष्ट होते.

१०. वादीच्या या अशा वर्तनावरुन दावा मिळकतीपैकी प्रतिवादी क्रमांक ३ ने खरेदी घेतलेल्या क्षेत्रामध्ये वादीची कब्जे वहिवाट होती व आहे असे मुळीच वाटत नाही. परिणामी, प्रतिवादी क्रमांक ३ ने खरेदी घेतलेल्या दावा मिळकतीपैकी क्षेत्रामध्ये वादीने ऊस पिकवला आहे असे मुळीच वाटत नाही. याउलट या क्षेत्रामध्ये प्रतिवादी क्रमांक ३ व त्यांच्या वारसांनी ऊस पीक घेतले आहे व हे क्षेत्र त्यांच्या कब्जे वहिवाटीस आहे असे प्रथम दर्शनी दिसून येते. त्यामुळे या क्षेत्रामधील ऊसाचे बिल हे वादीला मिळण्याचा प्रश्नच निर्माण होत नाही. किंबहुना हे बिल प्रतिवादी क्रमांक ३ यांच्या वारसांना मिळणेस पात्र आहे.

११. वादीतर्फे दाखल करण्यात आलेल्या **सलीम सन ऑफ यासीन वि. अतिरिक्त पहिले दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर, सहारनपूर व इतर, ए.आय.आर. १९९६ अलाहाबाद ४३२, टी. रवी व इतर वि. बी. चिन्ना नरसिम्हा २०१७**

**ऑल एस.सी.आर. ७३३** या न्यायनिवाडयांमध्ये वर नमुद केले कारणांचा संदर्भ दिसून येत नाही. त्यामुळे या न्यायालयासमोर असलेल्या प्रकरणातील वस्तुस्थिती व संदर्भीय न्यायनिवाडयांमधील वस्तुस्थिती यामध्ये साम्य वाटत नाही. सबब, संदर्भीय न्यायनिवाडयांचा सन्मान राखून हे न्यायनिवाडे या प्रकरणास लागू होत नाहीत असे मला वाटते.

१२. वरील सर्व कारणास्तव हा अर्ज फेटाळण्यास पात्र आहे. परिणामी, मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करत आहे:

## आदेश

१. अर्ज फेटाळण्यात येतो.

२. खर्चाबाबत आदेश नाही.

GIRISH SUDARSHAN MANE
Digitally signed by GIRISH SUDARSHAN MANE
Date: 2023.02.24 16:48:28 +0530

स्थळ : कोरेगाव
दिनांक : २३/०२/२०२३

( गि. सु. माने )
दिवाणी न्यायाधीश क.स्तर कोरेगाव.